अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# अच्छे दिनों की बुरी शुरुवात...!!

लोक ज्या आतुरतेने नरेंद्र मोदी यांच्या चांगल्या निर्णयांची वाट पाहात होते. त्या आतुरतेचीच वाट लावणारा पहिला-वहिला निर्णय मोदी सरकारने घेतला आहे. रेल्वे भाडे वाढीचा दणका देऊन मोदी यांनी सामान्य जनतेचा अपेक्षाभंग केल्यासारखेच म्हणावे लागेल. अच्छे दिन आ रहे है। किंवा अच्छे दिनों की बुरी शुरुवात हुई है। असे मिठास आश्वासन देऊन त्यांनी लोकांच्या अपेक्षा वाढवल्या होत्या. परंतु त्या तथाकथित 'अच्छे दिनों की बुरी शुरुवात' त्यांनी केलेली दिसते. सरकार स्थापन झाल्यावर किमान एखादा तरी किंवा पहिला चांगला निर्णय म्हणून त्यांनी सामान्य जनतेला दिलासा द्यायला हवा होता. परंतु भाडेवाढीसारखा कटू निर्णय घेऊन त्यांनी लोकांची मने नाराज केली आहेत. कदाचित त्यांचे सरकार आल्यानंतर पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन होईल. त्यात पाच-दहा निर्णय लोकांना खूश करणारे असतीलही परंतु त्याचा आता भरोसा देता येत नाही. लोकांना या सरकारकडून खूप वेगळ्या कारभाराची अपेक्षा आहे. त्याऐवजी मागच्याच सरकारच्या पावलावर पाऊल ठेवून भाडेवाढ आणि महागाईत वाढ करण्याचे उद्योग होणार असतील तर लोकांची अवस्था आगीतून फुफाट्यात गेल्यासारखी होईल. काही दिवसांपूर्वी म्हणजे जिथे या सरकारला सत्ता सांभाळून एक महिनाही झालेला नाही, त्याच्या आत कठोर आर्थिक निर्णयांना तोंड देण्याचा सल्ला हे नवे सरकार देणार असेल तर खूप काही वेगळे घडेल याची अपेक्षा ठेवता येत नाही. अर्थव्यवस्थेची सरकारी तुटीची, आर्थिक शिस्तीची कितीही कारणे सांगितली तरी ती केवळ बौद्धिक दिवाळखोरी ठरते. आज रेल्वेला अशी कोणती धाड भरली आहे की, भाडेवाढ केली नसती तर सगळ्या देशातली रेल्वेव्यवस्था कोलमडणार होती. रेल्वेने तर तोट्याचे कारण अजिबात सांगू नये. काही हजार कोटींचे अंदाजपत्रक असलेल्या रेल्वे कारभारात एवढा भ्रष्टाचार आणि उधळपट्टी माजली आहे की, रेल्वेच्या नावाने आज लाखो कॉन्ट्रॅक्टर आणि बडे अधिकारी तिजोऱ्या भरत आहेत. जागोजागी रेल्वेची प्रचंड साधन-सामुग्री अस्ताव्यस्त पडलेली आहे. अक्षरश: अब्जावधी रुपयांचे भंगार प्रत्येक रेल्वे यार्डात पडून आहे. अधिकारी रेल्वेचे सरदार असल्यासारखेच वावरतात आणि त्यांच्या खाजगी गाड्यांच्या वापरातून कोट्यवधींचा वाहन भत्ता त्यांच्या पगारात जमा होतो. दलाल आणि अधिकारी यांचे साटेलोटे खणून काढले तर रेल्वेला आज कोण चुना लावतोय हे सहजपणे कळून येईल. यापैकी एकाच्याही कातडीला धक्का न लावता रोज जिवाचे रान करून रोजगारासाठी प्रवास करणाऱ्या सामान्य माणसालाच पुन्हा बळी दिले जात असेल तर मोदी सरकारचे कौशल्य कोणते राहिले, असा प्रश्न निर्माण होतो.

## मुंबईकरांनी प्रत्युत्तर द्यावे

मोदींच्या नव्या सरकारने मुंबईकरांचा तर घोर अपमान केल्यासारखेच म्हणायला हवे. रोज लोकलमधून आपला जीव मुठीत धरून प्रवास करणाऱ्या इथल्या चाकरमान्याला मोठ्या दिलाशाची अपेक्षा होती. भाडे कमी करू नका परंतु थोडा मोकळा श्वास घेता येईल, अशा प्रकारच्या लोकल प्रवासाची सोय करा अशी माफक इच्छा असताना मोदी सरकारने मासिक पास दरात सरसकट जवळपास शंभर रुपये वाढ करून डोके फिरवण्याचेच काम केले आहे. ज्या मुंबईने सहाच्या सहा खासदार दिल्लीत पाठविले त्या मुंबईकरांना मोदींनी आपली पहिली भेट या पद्धतीने दिली आहे. या दरवाढीविरुद्ध आरडाओरडा झाल्यावर त्यात थोडीफार कपात करण्याची मलमपट्टी केली जाईल, परंतु त्याला मुंबईकरांनी भुलू नये. पुढची दोन वर्षे रेल्वे भाडेवाढ होऊ देणार नाही, असा निर्धार करून मोदींच्या पहिल्याच अन्यायी निर्णयाला प्रत्युत्तर दिले पाहिजे. मुंबईतल्या सहा खासदारांची या विषयावर दातखिळी बसता कामा नये. प्रचार करताना तर प्रत्येकजण राणाभीमदेवी थाटात मुंबईची लोकलसेवा सुरळीत करू अशा वल्गना करीत होते. चांगली रेल्वेसेवा हा आमचा अधिकार असल्याची घोषणा मुंबई भाजपाचे अध्यक्ष शेलारमामांनी दिली होती. मग आता या भाडेवाढीविरुद्ध तुमचाही आवाज उठला पाहिजे. प्रामुख्याने मुंबईतील उपनगरी रेल्वे प्रवाशांनी हा अन्याय सहन करण्याची गरजच नाही. मोदींना रोजच्या जीवनातल्या धावपळीतल्या या प्रवासात दिलासा मिळावा म्हणून मतदान केले आहे. तो दिलासा देता येत नसेल तर शांत बसा, पण इथल्या सामान्य चाकरमान्याला खलास तरी करू नका. ज्या मुंबईतून केंद्राला सर्वाधिक महसूल जातो त्याच मुंबईवर डोळे वटारण्याचे उद्योग करू नका! सरकार नवीन आहे. थोड्या दमाने आणि सामान्य माणसाच्या कलाने निर्णय घ्या. ते जास्त सोईचे ठरेल.

## भ्रष्टाचार रोखा, सुधारणा करा

एकतर मोदी सरकार महिनाभरात महागाई खाली आणण्याच्या दृष्टीने काहीतर कल्पक निर्णय घेईल आणि मोदी इफेक्ट दाखवेल असे वाटत होते. सरकारी तोटा, रेल्वेचा घाटा, ही सगळी कारणे इतकी गुळगुळीत झाली आहेत की, त्यावर सामान्यच काम परंतु एखाद्या अर्थतज्ज्ञांचाही विश्वास बसू शकत नाही आणि समजा तोटा असला तरी तो भरून काढण्याची अन्य कोणतीच माध्यमे, साधने उपलब्ध नाहीत काय? घरखर्च भागत नाही म्हणून पोटाला चिमटा घ्या, प्रत्येकाने दोन घास कमी खा असे सांगण्याचा हा तुघलकी प्रकार ठरतो. रेल्वेने एकदा स्वत:कडे किती संपत्ती आहे याची नीट मोजदाद करावी. मुंबईसारख्या महानगरीत रेल्वेची लाखो एकर जागा पडून आहे. तिचा व्यापारी पद्धतीने वापर करण्याची कल्पकतादेखील रेल्वे मंत्रालय किंवा अधिकारी दाखवू शकले नाही. तीच परिस्थिती देशभर आहे. भ्रष्टाचार तर इतका माजला आहे की, रेल्वे आरक्षणाच्या नावाखाली आयआरटीसी आणि दलाल मंडळी काय काय तमाशा करतात हे जर बाहेर आले तर रेल्वे म्हणजे भ्रष्टाचाराचा भस्मासूर असल्याचे सिद्ध होईल. प्रत्येक रेल्वे स्थानकावरचे स्टॉल काही ठरावीक लॉबी असलेल्यांना मिळतील. रेल्वेकडून सवलत घेऊन प्रवाशांचीच फसवणूक सुरू असते. अशा एकेक रेल्वे कहाण्या ऐकवल्या तर बेशुद्ध होण्याची वेळ येईल. म्हणूनच मोदी यांनी सर्वप्रथम सर्व मंत्रालयांचा कारभार सुधारावा. काटकसर आणि भ्रष्टाचार रोखण्यावर भर द्यावा. कोणत्याही भाडेवाढीपेक्षा सरकारची आपोआप बचत व्हायला सुरुवात होईल. मात्र यासाठी तेवढा प्रामाणिकपणा दाखवावा लागेल. सरकारी चष्म्यातून ते होणार नाही.